# पिक विमा योजना व वास्तविक परिस्थितीतील संभाव्य बदलांचे मुल्यमापन

दिपक बहालु सहारे
संशोधक विद्यार्थी,
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
Email ID - dipak.sahare1990@gmail.com
Mob no. 8275674837

प्रा. डॉ. उत्तमचंद तुकाराम कांबळे
वाणिज्य विभाग
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

---

**सारांश :**

*कृषी व्यवसाय हा भारतातील मुख्य व्यवसाय असुन येथील लोक शेती क्षेत्रावर अवलंबून असतात उद्योगाला लागणारा कच्चा मालाचा पुरवठा सुध्दा शेतीक्षेत्रापासूनच केला जातो अशा स्वयंभू असणाऱ्या शेतीक्षेत्रावर कालांतरापासून होणारे दुष्काळ व त्यापासून सावरू न शेतकरी अशा शेतकऱ्यांच्या आर्थिक व मानसिक विकासास हातभार लावण्यासाठी शासनाकडून सुरू करण्यात आलेल्या पीक विमा योजनेचा अभ्यास प्रस्तूत संशोधन निबंधात करण्यात आलेला आहे. या योजनेचा फायदा मुख्यत्वे कोणाला होऊन राहिला याविषयी विश्लेषन करण्यात आले आहे.*

**सूचक शब्द :** शेतकरी, पिक विमा योजना,

---

**प्रस्तावना :**

आपला भारत देश हा कृषी प्रदान देश आहे. या देशाची अर्थव्यवस्था कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. तसेच या देशाची ७० टक्के लोकसंख्या हि कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. देशात वेगवेगळया ऋतूमध्ये वेगवेगळे उत्पादन शेतीमध्ये घेतले जाते. देशात वेगवेगळया ऋतूमध्ये अनिश्चित स्वरूपाचे वातावरण असते. परंतू काही ठिकाणी काही कालावधीत वातावरण सोयीचे न राहता चक्री वादळ, गारपीट व अतीवृष्टी अशा अनेक नानाविध कारणामुळे शेतकऱ्यांना त्याच्या शेतीतील उत्पन्न मिळत नसतो. वर्षानुवर्षे अशीच परिस्थिती राहिल्यामुळे शेतकरी वारंवार कर्जाच्या बोझाखाली जात असतो. या दृष्ट चक्रातून शेतकऱ्यांची सुटका व्हावी, या ओढवलेल्या परिस्थितीतून शेतकऱ्यांना काढून त्याला आर्थिक आधार द्यावा. त्याच्या या परिस्थितीच्या निराकरणाचा अविभाज्य घटक बनावा यादृष्टीने शासनाने पिक विमा योजना अमलात आणली.

पिक विमा योजनेमुळे शेतकऱ्यांना एक महत्वाचा आधार व्हावा जेनेकरून त्या शेतकऱ्यांवर अनिश्चित परिस्थिती ओढवू नये समजा, अनिश्चित परिस्थिती ओढवल्यास एक सक्षम आर्थिक आधार असावा. हे सर्व घडत असतांना शेतकऱ्यांना व त्यांच्यावर ओढवलेली परिस्थिती दृष्टीसमोर ठेऊन पिक विमा योजना अस्तिवात आली. पिक विमा योजना आल्यापासून शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थिती सुधारतांना दिसत आहे. तसेच पिक विमा

योजना आल्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनमानात बदल घडून आलेला दिसतो काय? या विषयी थोडक्यात आढावा घेण्यात आलेला आहे.

**संशोधनाची गरज :**

शासनाने शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती व त्यांचे जिवनमान उंचावण्यासाठी सुरू करण्यात आलेली पिक विमा योजना प्रभावी ठरली काय? याची अभ्यासपूर्ण मांडणी करून संध्यास्थितीचे वास्तविक पाहणी करण्यासाठी संशोधकास संशोधानाची गरज वाटली.

**संशोधनाचे महत्व :**

शासनाने शेतकऱ्याची आर्थिक स्थिती बघता ती सुधारण्यासानी पिकविमा योजना किती प्रभावी आहे याचा अभ्याम

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोध निबंधामध्ये विश्लेषनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. या शोधनिबंधामध्ये दुष्यम स्त्रोताचा आढावा घेतला आहे. ज्यात प्रामुख्याने शासकीय अहवाल, शोधनिबंध, इंटरनेट व दैनिक वर्तमानपत्रे इत्यादींचा वापर करून माहिती संकलन करण्यात आली आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये:**

- पिक विमा योजना समजून घेणे.
- पिक विमा योजना अंमलबजावणीच्या कारणांचा आढावा घेणे
- पिक विमा योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी उपाय सुचविणे.

**प्रशासनाने राबविलेल्या पिक विमा योजना :**

- पिक विमा योजना १९७२ पासून देशामध्ये आहे. कालांतराने शेतकऱ्यांना योजनेबद्दल होणाऱ्या समस्यांमुळे व त्यासमस्यांच्या निराकरणाच्या उद्देशाने योजना बदलत गेल्या. १९८५ साली सुरू करण्यात आलेली पहिली पिक विमा योजना ही मर्यादित स्वरूपाची होती. या योजनेत ज्या शेतकऱ्यांची शेती २ हेक्टरपेक्षा कमी आहे अशा शेतकऱ्यांसाठीच प्रिमिअम अनुदानित होता. अशा वेगवेगळया कारणांमुळे व त्यां कारणांच्या सुधारणेस वाव मिळत गेला व योजनेत बदल घडत गेले.
- इ.स. १९९९ साली एनडीए सरकारने राष्ट्रिय कृषी विमा योजना अंमलात आणली या योजने अंतर्गत नैसर्गिक आपत्ती पासून संरक्षणासाठी विमा काढण्यात येत होते. परंतु योजनेत सुध्दा वेगवेगळया अडचणी शेतकऱ्यांना जानवत असत यामध्ये मुख्यत्वे शेतकरी ज्या ज्या पिकांचा उत्पादन करतो त्या सर्व पिकांचा समावेश या योजनेत www करण्यात आले नव्हते त्यामुळे या योजनेतसुध्दा कालांतराने बदल करण्यात आले.

- इ.स. २००४ मध्ये पिक योजना समिती गठीत करण्यात आली. गठीत झालेल्या समितीने राष्ट्रीय कृषी विमा योजनेत बदल करून त्याच योजनेला परत अंमलात आनले. पण ज्या बदलामुळे पिक विमा योजना जी विश्वसनीयता मिळवायला पाहीजे ती मिळवू शकली नाही व शेतकऱ्यांच्या दृष्टीकोणात ही योजना फारसा फरक पाडू शकली नाही.
- इ.स. २०१६ च्या केंद्रीय सरकारने १३ जानेवारी २०१६ रोजी प्रधानमंत्री पिक विमा योजनेस केद्रिय मंत्री मंडळाने मंजूरी दिली. या योजनेच्या अंमलबजावणी साठी संपूर्ण राज्यामध्ये एकच विमा कंपणी असणार असून इतर खाजगी विमा कंपण्या Agriculture Insurance Company of India शी संलग्नित केले होते. या योजनेत विमाच्या दाव्याची प्रक्रीया सुलभ व जलद गतिन व्हावी यासाठी तंत्रज्ञनाचा वापर करण्यात आला. तरी सुध्दा हि योजना ज्या प्रमाणात यशस्वी व्हायला पाहिजे त्या प्रमाणात यशस्वी होऊ शकली नाही.

**शासनाने केलेले दावे :**

पिक विमा योजना हि केंद्र सरकार द्वारे चालवलेली योजना आहे या योजनेअंतर्गत नैसर्गिक आपत्ती किंवा इतर वेगवेगळया कारणांमुळे शेतकऱ्यांच्या होणाऱ्या हाणीपासुन संरक्षण देण्याचे कार्य ही योजना करत असते. या योजनेअंतर्गत शासनाने अनेक दावे केले आहेत.

**१. उत्पन्न स्थिरता :**

पिक विमा योजना शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला स्थिरता देण्यास मदत करते. एखादया परिस्थितीत काही कारणास्तव आपत्ती कोसळली तर विमा योजना शेतकऱ्यांना संरक्षण देऊन त्याच्या उत्पन्नात स्थिरता आणते.

**२. नैसर्गिक आपत्ती आणि किड रोगापासून संरक्षण :**

पिक विमा योजना हि नैसर्गिक आपत्ती जसे की, अतिवृष्टी, दुष्काळ, पुर आणि किड रोग होणाऱ्या नुकसाणीपासून शेतकऱ्यांचे संरक्षण करते.

**३. आधुनिक तंत्रज्ञनाचा वापर :**

या योजनेअंतर्गत शासनाने तञ्चानाचा वापर करण्यासाठी प्रोत्साहन देण्यानेही आश्वासन दिले आहे. ज्यामुळे पिक उत्पादनात वाढ होईल व शेतकन्यांच्या उत्पादनात स्थिरता येऊन भार्थिक उभारी मिळेल.

**४. सरळ आणि सोइस्कर दावा प्रक्रिया :**

या योजनेअंतर्गत शेतकऱ्याला झालेल्या नुकसाणीच्या प्रसंगी त्यांच्याकडून करण्यात येणारी जी विमाच्या दाव्याची प्रक्रिया आहे ती सोपी व जलद करण्यासाठी प्रयत्ला केले आहेत. जेनेकरून शेतकऱ्यांना त्याच्य हक्काचे पैसे वेळेत मिळतील

**५. सर्व समावेशक संरक्षण :**

पिक विमा योजना ही शेतकऱ्यांकडून घेत असलेल्या विविध पिकांचा समावेश तसेच विविध भागांचा समावेश सुध्दा या योजनेत करण्यात आला आहे. ज्यामुळे शेतकऱ्यांचा मोठा वर्ग या योजनेचा लाभ घेऊ शकतो.

**६. राज्यात फळ पिकांसाठी योजना :**

शासनाने राज्यात डाळींब, आंबा, केळी, द्राक्षे, स्ट्रॉबेरी आणि पपई यासारख्या फळपिकासाठी सुध्दा शासनाने हवामानावर आधारीत पिक विमा योजना सुरू केली आहे ज्यामुळे शेतकऱ्यांकडून होणाऱ्या वेगवगळ्या उत्पादनाचा समावेश या योजनेत होऊन शेतकऱ्यांना आधार मिळावा.

**पिक विमा योजनेबद्दलचा अभिप्राय :**

**१. पंतप्रधान नरेंद्र मोदी :**

केंद्र शासनाच्या २०२४ च्या बजेट अंतर्गत ४ कोटी PMफसल विमा योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना पिक विमा देण्याचे बजेट मध्ये नोंद केलेली आहे. तरी पण सर्व शेतकऱ्याने १ रूपयात पिक विमा काढून या योजनेत सर्व शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे.

**२. मुख्यमंत्री देवेन्द्र फडणविसः**

केंद्र सरकारच्या २०१६ व्या प्रधानमंत्री पिक विमा योजनेत विमा हप्त्याच्या २ टक्के रूक्कम शेतकऱ्याने भरण्याची तरतुद आहे. आता हा भारसुध्दा शेतकऱ्यांवर न ठेवता त्यांच्या हिस्स्यांचा विमा हप्ता राज्य सरकार भरेल शेतकऱ्यांना केवळ १रूपया भरून प्रधानमंत्री पिक विमाच्या पोर्टलवर नोंदणी करता येईल.

**३. महाराष्ट्र कृषीमंत्री कोकाटे :**

प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत पिक काढणाऱ्या शेतकऱ्यांना कोणत्याही दाव्याची अडसर न होता त्यांचे सर्व दावे लवकरात लवकर निकाली काढले जातील यांची ग्वाही देतो व जास्तीत जास्त शेतकयांनी सहभागी व्हावे.

**पिक विमा योजनेची वस्तुस्थिती :**

**१. पिक विमा भरपाईस कंपन्यांकडुन दिरगाई :**

नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई मिळण्यासाठी पंतप्रधान पिक विमा योजनेत पूर्व सूचना दिलेल्या विदर्भातील सुमारे ८ लाख ४० हजार शेतकऱ्यांना कंपन्यानी अद्याप नुकसान भरपाई दिलेली नाही. दुसरीकडे, काही जिल्हात २५ टक्के अग्रिम भरपाईचे दावे विमा कपन्याकडून फेटाळण्यात आले. अशा अनेक घटना आहेत. गारपीठ, अतिवृष्टि, ढगफुटी, पुर, शेतात पाणी साचणे, विज कोसळून आग लागणे अश्या कारणामुळे पिकांचे नुकसान झाल्यास त्याला स्थानिक नैसर्गिक आपत्ती समजली जाते, अश्या परिस्थितीत

शेतकऱ्यांकडून पूर्वसूचना मिळाल्या नंतरही कंपन्या मात्र तातडीने कार्यवाही करतांना दिसत नाही.

**२. २५ टक्के अग्रिम भरपाईचे दावे कंपनीने फेटाळले :**

अमरावती विभागात खरीप पिकांची नुकसानीबाबत शेतकऱ्याऱ्यांनी विमा कंपनीकडे ८ लाख २९हजार ६७८ पूर्वसूचना दिलेल्या आहेत त्यापैकी काही प्रकरणात कंपन्यांवर सर्वेक्षण प्रक्रिया केली मात्र भरपाई दिलेली नाही. विविध जिल्हातील कामांचा आढावा घेतला मात्र कपन्याची दिरंगाई कायम आहे. पिक विमा भरपाइर्त कंपण्याकडून वेगवेगळया कारणास्तव दिरंगाई केली जाते. प्रामुख्याने भारतीय कृषी विमा कंपनी आणि युनायटेड इंडिया यांचेकडून शेतकऱ्याना मिळणे अपेक्षित असलेली भरपाई असुन मिळलेली नाही. शेतकऱ्यांना आजवर १७९१.५३ कोटींची नुकसान भरपाई मजूर झालेली आहे त्यापैकी ८ लाख ७८ हजार ५५१ रूनये लाभार्थ्यांच्या खात्यावर ३१८.८६ कोटी जमा झाले असून अद्याप १४७२.६७ कोटी रूपये जमा करणे बाकी आहे याशिवाय अद्याप ६ लाख सुचनांचे सर्वेक्षण बाकी आहे

**३. विमा देण्याच्या जाचक अटीमुळे शेतकरी त्रस्त :**

नागपुर जिल्हातील काटोल, मरखेड तालुक्यात वर्षा नदिलगतच्या शेतात पुराच्या पाण्याबरोबर मोठ्या प्रमाणात गाव वाहून आल्यामुळे फार मोठ्या प्रमाणात शेतीचे नुकसान झाले. शासन निर्णयानुसार, वाहून आलेल्या माती मिश्रित गावामुळे शेतजमिन खराब झाली असेल तर त्यासाठी प्रति हेक्टर १२,२०० रूपये मदतीची तरतुद आहे. मात्र शेतकऱ्याने कोणत्याही सरकारी योजनेचा लाभ किंवा अनुदान घेतलेले नसावे अशी अट आहे. ग्रामिण भागात शेतकरी घरकुल किंवा शौचालय या योजनांच्या लाभार्थी असतोच त्यामुळे अशे शेतकरी अपात्र ठरतो.

**४. फळपिक विमा, तिनपट महाग :**

फळपिक विमा योजना शेतकऱ्यांच्या हितासाठी आहे की कंपानीच्या फायद्यासाठी आहे. अशी परिस्थिती समोर आलली आहे. शेतकरी आपल्या फळबागाच्या संकटाचा नेहमी सामना करीत फळपिकांचे रक्षण करती. परंतु अश्या परिस्थितहीं विम्याची रक्कम महागली. परंतु त्या तुलनेत शेतकऱ्याऱ्यांनी विमा संरक्षण मिळणारी रक्कम कमी आहे.२०२०-२१ मध्ये संत्री विम्याची रक्कम प्रति हेक्टरी ४००० रूपये होती. त्यावरील शेतकन्यांना विमा संरक्षित मिळणारी रक्कम ८० हजार रूपये इतके होते. परंतु यामध्ये शासनाने विम्याचे रक्कम तिनपट वाढवून प्रति हेक्टरी १२ हजार रूपये केले आहे. अश्वामध्ये सरश्चित रक्कम सुध्दा तीनपट वाढवायला पाहिजे पण तसे न केल्यामुळे शेतकन्यांना याचा भदंड व नाहकचा आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे.

**५. बोगस विमा काढणारी टोळी सक्रिय :**

मुळ शेतकऱ्याला अंधारात ठेवून परस्पर भाडेकरार करून पिकांचा विमा काढला जातो. सागली, सातारा आणि जालना जिल्हात डाळिंब पिकांचा विमा काढला. विमा कंपनीला संशय आल्यावर पडताळणी केली असता या गावात डाळिंबाची बागच काय, एकही झाड नसल्याचा धक्काधायक प्रकार उजेळात आला. अश्या अनेक घटनामुळे शेतकऱ्यांना संरक्षण न मिळण इतरच लोकांना याचा फायदा होत आहे.

**निष्कर्ष :**

केंद्र शासनाने सुरू केलेली पिक विमा योजना शेतकऱ्यांच्या दृष्टीने अंत्यंत महत्वाची आहे. या बॉजनेमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य निर्माण होऊ शकते. परंतु वास्तविक परिस्थिती बगता असे घडतांना दिसून येत नाही. या योजनाची अंमबजावणी करतांना खूप मोठ्या प्रमाणात अडचणीचा सामना करावा लागत आहे. शासनाकडुन पाहिजे त्या प्रमाणात मदत होतांना दिसत नाही. उलट यांबा फायदा पिक विमा कंपन्यानाच होतांना दिसतो स्थानिक पातळीवरील शेतकरी या योजनेपासून समाधानी दिसत नाही विमा कंपन्या व प्रशासनातील अधिकाऱ्याकडूनच शेवकऱ्यानी पिळवणूक होत आहे. शासनाने या सर्व बाबी लक्षात घेऊन एक बांगली पिक विमा योजना शेतकऱ्यांसाठी आणावी. ज्यामुळे सर्व शेतकरी या योजनेत अंतर्भूत होतील

**संदर्भ सूची :**

- वर्तमापत्र: लोकसत्ता, लोकमत
- https://www.pmfby.gov.in
- अर्थनीती फसल विमा योजना में सुधार